# निओनेटल थेरपिस्ट संस्था एक स्तुत्य उपक्रम- खा.किरीट सोमय्या

**ठाणे : प्रतिनिधी**

निओनेटल थेरपिस्ट संस्था एक स्तुत्य उपक्रम असून भाजपचीच सत्ता आली तर निओनेटल थेरपिस्टची माहिती लोकसभेत देईन आणि जे पाल्य आणि पालक या रोगाचा सामना करत आहेत त्यांना आधार देणाऱ्या संस्थेला नक्कीच मदत करेन असे मत खासदार किरीट सोमैय्या यांनी व्यक्त केले.

निओनेटल थेरपिस्टची पहिली राष्ट्रीय परिषद टिपटॉप प्लाझा येथे रविवारी भरविण्यात आली होती. यावेळी ते बोलत होते. या कार्यक्रमाचे उद्घाटन आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या माजी कुलगुरू मृदुला फडके यांच्या हस्ते पार पडले. भारतात वेळेआधीच होणाऱ्या बाळंतपणात वाढ झाल्याने नवजात बालकांचे आरोग्य धोक्यात आले असल्याची माहिती डॉ. फडके यांनी दिली. दिवसभराच्या या परिषदेत लहान मुलांमधील आजार कसे ओळखावे याबद्दल विविध तज्ञांनी मार्गदर्शन केले. यावेळी डब्ल्यूएचओच्या अहवालानुसार जगभरात वर्षाला सुमारे १५ दशलक्ष अकाली प्रसूती होत आहेत. त्यातील २२ टक्के मुदतपूर्व प्रसूती या भारतात होतात. यामुळे नवजात शिशूंना सेरेबल पाल्सी, संवेदनसंबंधी त्रुटी, आकलनासंबंधीचे विकार, श्वसनासंदर्भातील आजार उदभवत असल्याचे या परिषदेत सांगण्यात आले. त्यामुळे भारतात १२ दशलक्ष बालके दिव्यांग म्हणून आयुष्य जगात असल्याची माहिती या परिषदेत देण्यात आली.

बाळ जन्माला आल्यानंतर त्याचा २ वर्षांचा वाढदिवस होईपर्यंत निओनेटल थेरपिस्ट हि संस्था बाळाची काळजी घेणार आहे. केइएम येथे या संस्थेची स्थापना झाली असून जास्तीस्त जास्त बालकांना तातडीने उपचार मिळावे आणि पालकांनांही याची माहिती व्हावी यासाठी संस्थेची निर्मिती करण्यात आली असल्याचे राष्ट्रीय परिषदेत सांगण्यात आले.